बुधवार, दि ७ जानेवारी २०२६ ● जालना ● वर्ष १३ वे ● अंक १८ वा ● किमंत २ रु. ● पाने ४ RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

# सकारात्मक पत्रकारिता ही समाजासाठी प्रेरणादायी

## आमदार अर्जुनराव खोतकर यांचे प्रतिपादन; पीसीएम जालनाच्यावतीने दर्पण दिन साजरा

## सत्य व निर्भीड लेखनातून समाजपरिवर्तन शक्य - रावसाहेब दानवे

## पत्रकारिता ही लोकशाहीचा चौथा स्तंभ - आ. बबनराव लोणीकर

## दैनिक त्रिकाल संघर्ष’ या नव वृत्तपत्राचे भव्य लोकार्पण

**जालना । प्रतिनिधी -** सत्य आणि निर्भिड लेखनीतून समाजपरिवर्तन शक्य असून पत्रकारिता केवळ बातम्या देण्याचे माध्यम नसून समाजातील प्रश्न व अपेक्षा शासनापर्यंत पोहचविणारे प्रभावी साधन असल्याचे प्रतिपादन माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी केले. तसेच पत्रकारितेचे सामाजिक दायित्व, सत्य लेखनाचे महत्त्व अधोरेखित करत आमदार बबनराव लोणीकर यांनी दर्पण दिनाच्या निमित्ताने उपस्थित पत्रकार बांधवांना शुभेच्छा देत मार्गदर्शन केले. पत्रकारांचा गौरव करतांना पत्रकारिता ही लोकशाहीचा चौथा स्तंभ असून समाजाला योग्य दिशा देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य पत्रकार करीत असल्याचे मत आ. लोणीकर यांनी व्यक्त केले. सकारात्मक दृष्टीकोन ठेवून केली जाणारी पत्रकारिता ही समाजाला योग्य दिशा देणारी व प्रेरणादायी असून पत्रकारांनी सामाजिक भान जपत जबाबदारीने लेखन करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन विधिमंडळ अंदाज समितीचे अध्यक्ष तथा आमदार अर्जुनराव खोतकर यांनी केले. प्रेस कौन्सिल ऑफ महाराष्ट्र, जालना शाखेच्यावतीने मंगळवार (दि ६) रोजी भारती लॉन्स येथे आयोजित सत्कार पत्रकारितेचा सन्मान पत्रकारांचा दर्पण दिन कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

ज्येष्ठ पत्रकार अंकुशराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमास पान ३ वर












छाया/जावेद तंबोल

## संपादकीय

# सबसे बडा खिलाडी सुरेश कलमाडी

सुरेश कलमाडी या नावाशिवाय पुण्याचा राजकीय इतिहास पूर्णच होऊ शकत नाही. जवळपास तीन दशके पुण्याच्या राजकारणावर एकहाती हुकूमत गाजवणारे पुण्याचे कारभारी असलेले पुण्याचे माजी खासदार सुरेश कलमाडी यांचे मंगळवार ६ जानेवारी रोजी वयाच्या ८२ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने पुण्यावर एकहाती वर्चस्व गाजवणारा नेता काळाचा पडद्याआड गेला. १ मे १९४४ रोजी जन्मलेले सुरेश कलमाडी यांनी सेंट व्हिन्सेंट हायस्कुलम धून आपले शालेय शिक्षण पूर्ण केले तर पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजम धून उच्च शिक्षण पूर्ण केले. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी पुण्याच्या नॅशनल डिफेन्स अकॅडमीमध्ये प्रवेश घेऊन पायलट बनण्याचे प्रशिक्षण घेतले. प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी काही वर्ष भारतीय हवाई दलात पायलट म्हणून सेवा केली. १९६५ आणि १९७१ च्या युद्धात त्यांनी हवाई दलाचे पायलट म्हणून भाग घेतला होता. १९७२ साली त्यांनी राजकारणात प्रवेश केला. संजय गांधी यांचे ते निकटवर्ती होते त्यांच्यामुळेच ते राजकारणात आले असे म्हंटले गेले. काँग्रेस पक्षात प्रवेश केल्यावर त्यांना पुण्याचे प्रमुख बनवण्यात आले. त्या काळी पुण्यात अनेक दिग्गज नेते होते मात्र सर्वांना बाजूला सारून त्यांनी पुण्याची धुरा स्वीकारली. ९० च्या दशकात तर पुण्यावर त्यांचे एकहाती वर्चस्व होते. १९९१ साली तत्कालीन पंतप्रधान पी व्ही नरसिंहराव यांनी त्यांना आपल्या मंत्रिमंडळात घेतले आणि रेल्वे राज्यमंत्रीपदाची जबाबदारी त्यांच्यावर सोपवली. रेल्वे राज्यमंत्री म्हणून त्यांनी रेल्वेचा अर्थसंकल्पही सादर केला होता. केंद्रीय मंत्री आणि पंतप्रधान नरसिंहराव यांचे निकटवर्ती असल्याने पुण्यावर त्यांनी एकहाती वर्चस्व गाजवायला सुरुवात केली. पुण्यात ते काँग्रेसचे सर्वेसर्वा बनले. पुणे महानगर पालिकेवर त्यांचे एकहाती वर्चस्व होते. पुण्याचे नगरसेवक, पुण्याचा महापौर कोण होणार हे कलमाडी ठरवत असे. पुण्याचे आमदार देखील कलमाडींच्याच मर्जीतील असत. पुण्याच्या राजकारणावर त्यांची एकहाती पकड होती म्हणूनच त्यांना पुण्याचे कारभारी असे संबोधले जायचे. त्यांच्याभोवती कार्यकर्त्यांची रीघ लागलेली असे. त्यांचे कलमाडी हाऊस कार्यकर्त्यांनी फुलून गेलेले असे. केंद्रीय मंत्री आणि पुण्याचा खासदार या नात्याने त्यांनी पुण्याला जागतिक शहर बनवण्याचा प्रयत्न केला. पुणे मेट्रो प्रकल्प, विमानतळ विकास त्यांच्याच प्रयत्नामुळे साकार झाले. पुण्यात सर्वप्रकारच्या पायाभूत सुविधा असाव्यात असा त्यांचा आग्रह असे. पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन आणि पुणे फेस्टिवल सुरू करून त्यांनी पुण्याला जागतिक स्तरावर नेले. १९९१ ते १९९६ या काळात पुणे काँग्रेसचे सर्वे सर्वा असणाऱ्या कलमाडी यांनी १९९७ साली मात्र काँग्रेस सोडली. १९९८ साली झालेल्या लोकसभा निवडणुकीत त्यांचा पराभव झाला. पराभवानंतर कलमाडी यांनी शरद पवारांमुळेच आपल्याला पराभव स्वीकारावा लागला असे त्यावेळी जाहीर वक्तव्य केले होते. अपक्ष म्हणून निवडणुकीत उभे राहिलेल्या कलमाडी यांना भाजपने पाठिंबा दिला होता आणि त्यांच्या प्रचारासाठी तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी पुण्यात आले होते. १९९८ साली झालेली राज्यसभा निवडणूक खूप गाजली या निवडणुकीत ते पुन्हा अपक्ष म्हणून उभे राहिले. या निवडणुकीत त्यांचे प्रतिस्पर्धा होते राम कदम. राम कदम हे गांधी कुटुंबाच्या जवळचे होते शिवाय जिंकून येण्याइतपत मते त्यांच्याकडे होते तरीही त्यांना धोबीपछाड देऊन कलमाडी यांनी ती निवडणूक जिंकली आणि राजकारणात भूकंप घडवला होता. या विजयानंतर त्यांच्या कार्यकर्त्यांनी सबसे बडा खिलाडी सुरेश कलमाडी अशा घोषणा दिल्य होत्या. १९९९ साली काँग्रेस फुटली शरद पवारांनी राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना केली सुरेश कलमाडी पुन्हा काँग्रेसमध्ये परतले. २०१० पासून मात्र त्यांच्या राजकीय कारकीर्दीला उतरती कळा लागली. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत गैरव्यवहार केल्याचा त्यांच्यावर आरोप करण्यात आला. त्यांना काहीकाळ तुरुंगातही रहावे लागले. २०२५ साली ईडी ने त्यांच्या विरोधात पुरावे नसल्याने क्लोजर रिपोर्ट दाखल केला न्यायालयानेही तो स्वीकारला पण तोपर्यंत खूप उशीर झाला होता. सुरेश कलमाडी हे राजकीय विजनवासात पोहचले होते. जवळपास तीन दशके पुण्याचे कारभारी राहिलेले सबसे बडे खिलाडी सुरेश कलमाडी यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# कार्यकर्त्यांना न्याय देण्यासाठी राष्ट्रवादी महायुतीतून बाहेर- आ. काळे

## राकांपा मनसे युती उमेदवार प्रचाराचा शुभारंभ



**जालना । प्रतिनिधी -** जालना शहर महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित दादा) पक्षाला नाईलाजास्तव आणि सर्व समाज घटकातील कार्यकर्त्यांना न्याय देण्यासाठी महायुतीतुन बाहेर पडावे लागले, म्हणुन पक्षाचा अपमान करणाऱ्यांना या निवडणुकीत धडा शिकवा असे आवाहन आमदार विक्रम काळे यांनी केले आहे.

जालना जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजितदादा) व मनसे युतिचा निवडणूक प्रचाराचा शुभारंभ सोमवार कुलस्वामीनी मंगल कार्यालय जिल्हा पक्ष कार्यालय जालना येथे आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी श्री. काळे हे बोलत होते कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जालना जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष आमदार अरविंदराव चव्हाण हे होते. या प्रसंगी अल्पसंख्यांक विभागाचे प्रदेश अध्यक्ष ॲड. नासेर काझी प्रदेशउपाध्यक्ष मधुकरराव आर्दड, शहर जिल्हाअध्यक्ष शेख महेमूद, महिला प्रदेश सरचिटणीस शंकुतलाताई कदम, युवक प्रदेश सरचिटणीस धैर्यशिल चव्हाण, भाऊसाहेब गोरे, अल्पसंख्यांक विभागाचे जिल्हा अध्यक्ष शहाआलम खान महिला जिल्हा अध्यक्ष मंगलताई पाटील, शहर जिल्हा कार्याध्यक्ष मिर्झा अनवर बेग, प्रा. सोपानराव तेलगड, अण्णासाहेब चितेकर, प्रभाकर घेवंदे, सतिश वाहुळे, आदि म ान्यवर उपस्थित होते. पुढे बोलतांना श्री. काळे म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा शिवशाहुफुले आंबेडकर धर्मनिरपेक्ष विचारावर चालणारा पक्ष आहे. ही बाब पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी वारंवार राज्याच्या जनतेसमोर मांडलेली आहे.

जालना शहराचा सर्वांगिण विकास करण्यासाठी आणि विशेष करुन शहरातील पिण्याचा पाण्याचा प्रश्न, स्वच्छता, आदी प्रश्नावर लक्ष केंद्रीत करण्यात येईल असे श्री. काळे म्हणाले.

अल्पसंख्यांक विभागाचे प्रदेश अध्यक्ष ॲड नासेर काझी बोलतांना म्हणाले की, जालना नगरपालिकेत सत्तेत असलेल्या लोकांनी या शहराचा विद्रुप चेहरा केलेला आहे. नागरिकांना सध्या नागरी सुविधा उपलब्ध होत नाही ही दुर्दैवी बाब आहे. अनेक वर्षांपासुन पिण्याच्या पाण्याचा प्रश्न जसाचा तसा आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार निश्चितपणे या शहराकडे विकासात्मक दृष्टीने पाहतील यात शंका नाही. म्हणुन मतदाराने राष्ट्रवादी काँग्रेस व मनसे युतीच्या उम ेदवारांना विजयी करावे असे आवाहन श्री. काझी यांनी केले. जालना जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष माजी आमदार अरविंदराव चव्हाण म्हणाले की, निवडणुकीच्या सुरुवातीपासुनच आम्ही महायुती म्हणुन निवडणूक रिंगणामध्ये उतरणार होतो. परंतु आम्हाला शेवटपर्यंत अंधारात ठेवण्यात आले.

भाजप हा पक्ष कधी विश्वासघात करेल हे सांगणे फार कठीण असल्याचे त्यांनी सांगुन राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि मनसे युती या निवडणुकीत आपली ताकद दाखवुन देईल. उमेदवार आणि पक्षाच्या कार्यकर्त्यांनी पुर्ण ताकदीने या निवडणुकीत झोकुन द्यावे असे आवाहन श्री. चव्हाण यांनी यावेळी केले.

महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादीचे उपाध्यक्ष व जिल्हा समन्वयक मधुकरराव आर्दड म्हणाले की, जालना शहर हे उद्योगाचे केंद्र आहे येथील स्टिल कंपन्याचे नाव राज्यभर नावाजलेले आहे. तर बी-बियाणे उद्योग हा संपुर्ण देशात नावाजलेला असतांना या शहराची झालेली दुर्वस्था पहावत नाही. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला महानगरपालिकेच्या सत्तेत मोठा वाटा मि ळाल्यास निश्चितपणे विकास आराखडा आणि स्वच्छ सुंदर शहर करण्यासाठी आपला मानस आहे असे त्यांनी सांगितले.

श्री आर्दड हे जालना नगर परिषदेचे मुख्य अधिकारी राहिल्याने आणि म राठवाडा विभागाच्या आयुक्त पदावर कार्यक्षमपणे काम केल्यामुळे जिल्ह्याची त्यांना संपुर्ण माहिती आहे. यावेळी मनसेचे जिल्हा अध्यक्ष रवि राऊत, शकुंतलाताई कदम, धैर्यशिल चव्हाण, शहाआलम खान, भाऊसाहेब गोरे, अण्णासाहेब चितेकर, भगवान कावळे आदी ने आपले विचार मांडले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक जालना शहर जिल्हा अध्यक्ष शेख महेमुद यांनी केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी राष्ट्रवादी काँग्रेस आणि मनसे युती उम ेदवारांच्या प्रचाराच्या शुभारंभनारळ फोडुन शेकडो कार्यकत्यांच्या उपस्थितीत करण्यात आला. यावेळी संपुर्ण शहरातुन उमेदवार आणि कार्यकर्ते वाजत-गाजत कार्यक्रम ास्थळी पोहचले होते. यावेळी रिंकलताई तायड, शितलताई बारोटे, बबन गाडे, शिवराज जाधव, प्रविण शिंदे, संतोष ढेंगळे, जहीर बिल्डर, सिताराम तुपे, जावेद अली युतीचे सर्व उमेदवार पक्षाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थितीत होते. कार्यक्रमाचे संचालन शहर जिल्हा कार्याध्यक्ष मिर्झा अनवर बेग यांनी केले. संतोष ढंगळे यांनी उपस्थितीचे आभार मानले.




हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

# सकारात्मक पत्रकारिता ही समाजासाठी प्रेरणादायी



छाया/जावेद तंबोली





जावेद तंबोली






पान १ वरून

माजी खासदार रावसाहेब दानवे, आमदार बबनराव लोणीकर, आमदार अर्जुनराव खोतकर, माजी आमदार कैलास गोरंट्याल, पंडित भुतेकर, सर्जेराव जाधव, वाघ महाराज, विनायक दहातोंडे, रमेश खोत, भरत मानकर तसेच प्रेस कौन्सिल ऑफ महाराष्ट्रचे जालना जिल्हाध्यक्ष दीपक शेळके यांच्यासह जिल्ह्यातील ज्येष्ठ व युवा पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमात संपादक बाबासाहेब आटोळे यांच्या 'दैनिक त्रिकाल संघर्ष' या वृत्तपत्राचे मान्यवरांच्या हस्ते भव्य लोकार्पण करण्यात आले. उपस्थित पाहुण्यांनी नव्या वृत्तपत्रास शुभेच्छा दिल्या.





आमदार खोतकर पुढे म्हणाले की, पत्रकारिता हे केवळ बातमी देण्याचे साधन नसून समाजातील दुःख, वेदना, प्रश्न आणि अपेक्षा शासनापर्यंत पोहोचविणारे प्रभावी माध्यम आहे. जालना शहरातील रेशीम बाजारपेठ व मोसंबी बाजारपेठेच्या विकासात प्रसारमाध्यमांचा मोठा वाटा आहे. पत्रकारांनी वास्तव मांडल्यास त्याला कोणीही नाकारू शकत नाही. त्यामुळे चुकीच्या गोष्टी दुरुस्त करण्याची संधी मिळते. मात्र नकारात्मकतेवर आधारित लेखन समाजमन दूषित करते. म्हणून पत्रकारांनी सकारात्मक दृष्टीकोन ठेवून लेखन करावे, असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी त्यांनी दिवंगत शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रभावी व निर्भीड पत्रकारितेची उदाहरणेही दिली.

यावेळी पुढे बोलताना आमदार बबनराव लोणीकर यांनी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या कार्याचे स्मरण करून त्यांच्या पत्रकारितेचे महत्त्व अधोरेखित केले. दि. ६ जानेवारी १८३२ रोजी बाळशास्त्री जांभेकर यांनी सुरू केलेले 'दर्पण' हे पहिले मराठी वृत्तपत्र मानले जाते. इंग्रजी सत्ताकाळात समाजप्रबोधन, शिक्षण, विज्ञाननिष्ठ विचार व सामाजिक सुधारणांचा प्रसार करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी पत्रकारितेच्या माध्यमातून केले. बाळशास्त्री जांभेकर हे केवळ पत्रकार नव्हते, तर ते विचारवंत, शिक्षक, इतिहासकार आणि समाजसुधारक होते. सत्य, विवेक, निर्भीड मांडणी व लोकजागृती हीच पत्रकारितेची खरी ओळख असल्याने आजच्या डिजिटल युगातही त्यांच्या मूल्याधिष्ठित पत्रकारितेचा आदर्श पत्रकारांसाठी मार्गदर्शक ठरतो असे आमदार लोणीकर या वेळी म्हणाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात ज्येष्ठ पत्रकार अंकुशराव देशमुख म्हणाले की, पत्रकारांनी उथळपणा टाळून वास्तवाधिष्ठित लेखन करावे. पत्रकाराने सातत्याने सत्यशोधकाची भूमिका बजावली पाहिजे. इलेक्ट्रॉनिक माध्यमांचे प्राबल्य वाढले असले तरी आजही सर्वसामान्य माणसाचा मुद्रित माध्यमांवरील विश्वास अबाधित आहे. माध्यमांचे स्वरूप बदलले असले तरी पत्रकारांनी विश्वासार्हता जपणे ही काळाची गरज आहे.

या प्रसंगी माजी आमदार कैलास गोरंट्याल, ज्येष्ठ पत्रकार लियाकत अली खान यासेर व अच्युत मोरे यांनीही मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात ज्येष्ठ पत्रकार अंकुशराव देशमुख, विनायक दहातोंडे, रमेश खोत, लियाकत अली खान यासेर, अहमद नूर, अभयकुमार यादव, बद्री उपरे, लक्ष्मीकांत कुलकर्णी, राजेंद्र घुले, विलास खानापुरे, ओमप्रकाश शिंदे, रमेश बोबडे, आयेशा खान मुलानी, शिवकुमार भारुका, अंकुश गायकवाड आदींचा सपत्नीक व सहपरिवार सन्मान करण्यात आला. तसेच जिल्ह्यातील दीडशेहून अधिक पत्रकार व जाहिरात प्रतिनिधींना स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

प्रेस कौन्सिल ऑफ महाराष्ट्रच्यावतीने शहरात वृत्तपत्र वितरणाचे काम करणारे मनोज गरदास व ज्ञानेश्वर बुरला या दोन मुलांना सायकल भेट देण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आशिष रसाळ यांनी केले. प्रास्ताविक विधिमंडळ व मंत्रालय संपादक पत्रकार संघाचे प्रदेश सचिव भरत मानकर यांनी केले, तर आभार प्रेस कौन्सिल ऑफ महाराष्ट्र, जालना जिल्हाध्यक्ष दीपक शेळके यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दर्पण सकलेचा, आमेर खान, शेख चाँद पी.जे., विष्णु कदम, बाबासाहेब आटोळे, सुहास वैद्य, शेख अशफाक, सुनील भारती, आशिष तिवारी, माणिक जैस्वाल, बाबासाहेब कोलते, दिनेश नंद, सय्यद सलमान, नरेंद्र जोगड, सुनील नरवडे, निकिता काळे, शेख मेहजबीन यांच्यासह प्रेस कॉन्सीलचे सर्व पदाधिकारी- सदस्यांनी परिश्रम घेतले.

या प्रसंगी अतिश राठोड, अंकुश बोबडे, कैलास शेळके, मालदारसाहेब, नरेश सोनवणे, विजय सुराशे, महादेव आटोळे, सत्तू शेठ इंदानी, विठ्ठल आटोळे, नारायण गोरे, अतुल आटोळे यांची प्रमुख उपस्थिती होती.






## स्वामी विवेकानंदांच्या जीवनावर विद्यार्थ्यांसाठी प्रश्नमंजुषा परीक्षा

# १५ जानेवारीपर्यंत सहभाग नोंदवावा-अभय कुलकर्णी

**जालना । प्रतिनिधी -** स्वामी विवेकानंद सहकारी पतसंस्थेच्यावतीने राष्ट्रीय युवा दिन आणि युवकांचे प्रेरणास्थान स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीचे औचित्य साधून दरवर्षीप्रमाणे यावर्षीही सातवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी स्वामी विवेकानंदांच्या



जीवनावर आधारित जिल्हास्तरीय ऑनलाइन प्रश्नमंजुषा परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे. आतापर्यंत ४२ शाळांच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला आहे. १५ जानेवारी ही नाव नोंदणीची शेवटची तारीख असून, क्यूआर कोड अथवा लिंकद्वारे सहभाग घेता येणार असल्याचे संस्थेचे अध्यक्ष अभय कुलकर्णी यांनी कळविले आहे.

स्वामी विवेकानंद यांचे विचार आणि त्यांचे कार्य नवीन पिढीपर्यंत पोहोचावे, त्यांच्यात सकारात्मक दृष्टिकोन वृद्धिंगत व्हावा,
या उद्देशाने ही परीक्षा आयोजित केली जाते. या ऑनलाईन परीक्षेसाठी १ ते १५ जानेवारी हा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. नाव नोंदणी निशुल्क असून, नांदणी आणि ऑनलाईन परीक्षेसाठी क्यू आर कोड आणि लिंक देण्यात आली आहे. त्यामध्ये सरावासाठी आवश्यक माहिती असणारी पीडीएफ पुस्तिकादेखील संस्थेमार्फत उपलब्ध करून देण्यात आलेली असून,
परीक्षेत सहभागी होणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला ई-प्रमाणपत्र, सहभागी शाळांना सन्मानपत्र, प्रत्येक शाळेतून प्रथम व द्वितीय क्रमांक पटकवणाऱ्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते विशेष पारितोषिक देऊन गौरविण्यात येणार आहे.

दरवर्षी जालना जिल्ह्यातील ६० पेक्षा जास्त शाळा मधील १५०० पेक्षा अधिक विद्यार्थी या उपक्रमात सहभागी होत आहेत. आतापर्यंत ४२ शाळांनी नोंदणी केली आहे. उर्वरित शाळांनी वेबसाईट लिंक www.ipaindia.in/sve26 या लिंकवर जाऊन आपली नोंदणी करावी. नाव नोंदणीसाठी अथवा क्यू आर कोड प्राप्त करण्यासह काही अडचणी येत असतील तर ८८३०३१८९९७ या मोबाईल क्रमांकावर किंवा नजीकच्या शाखेत संपर्क साधून मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन पतसंस्थेचे अध्यक्ष अभय कुलकर्णी व या उपक्रमाचे समन्वयक साईप्रसाद भोंडे आणि कल्याण दाभाडकर यांनी केले आहे

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेच्या विद्यार्थ्यांना आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** शैक्षणिक वर्ष २०२५-२६ योजनेचे अर्ज ऑनलाईन पद्धतीने https://hmas.mahait.org/ या संकेतस्थळावर दिनांक ३१ डिसेबर २०२५ पर्यंत स्विकारण्यात आलेले होते. सन २०२५-२६ या वर्षासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचे ऑनलाईन भरलेले अर्ज विद्यार्थ्यांनी दि. ८ ते १६ जानेवारी २०२६ पर्यंत सकाळी १०.३० ते ४.३० पर्यंत सहायक आयुक्त, समाज कल्याण जालना या कार्यालयात जमा करावेत, असे आवाहन समाज कल्याणचे सहायक आयुक्त राजु एडके यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

शासकीय वसतिगृहात प्रवेश घेण्यास पात्र असलेल्या परंतु शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या/शासकीय वसतिगृहात प्रवेश न घेतलेल्या तसेच निवास, भोजन व अन्य सुविधांअभावी पुढील शिक्षण घेऊ शकत नसलेल्या अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील विद्यार्थ्यांपैकी अकरावी, बारावी तसेच बारावी नंतरच्या व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये विविध स्तरावरील महाविद्यालयात, शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहातील मुला-मुलींप्रमाणे भोजन, निवास, शैक्षणीक साहित्य व इतर आवश्यक सुविधा स्वतः उपलब्ध करुन घेण्यासाठी आवश्यक रक्कम विद्यार्थ्यांच्या आधारसंलग्न बँक खात्यामध्ये थेट जमा करण्यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे. असेही कळविले आहे.

## आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन

**जालना । प्रतिनिधी -** आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा माहिती कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात जिल्हा माहिती अधिकारी अरुण सुर्यवंशी यांनी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी जेष्ठ पत्रकार, संपादक, प्रतिनिधी यांच्यासह जिल्हा माहिती कार्यालयातील अधिकारी-कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

## काबरा वॉरियर्स संघ ठरला माहेश्वरी बॉक्स क्रिकेट लीग स्पर्धेचा विजेता

**जालना । प्रतिनिधी -** स्व. धोंडाबाई तोतला बहुउद्देशीय सेवाभावी संस्था जालनाच्यावतीने जुन्या औद्योगिक वसाहतीतील केनिया टर्फवर १ ते ४ जानेवारीदरम्यान ४० वर्षावरील समाज बांधवांसाठी पार पडलेल्या माहेश्वरी बॉक्स क्रिकेट लीग स्पर्धेत काबरा वॉरियर्स संघ विजेता तर बी प्लस सुरक्षा संघ उपविजेता ठरला. या चार दिवसीय डे नाईट स्पर्धेत आनंदनगरी स्ट्रायकर्स, काबरा वॉरियर्स, पॅव्हिलियन स्ट्रायकर्स, बीएम टायटन्स, काका स्ट्रायकर्स, एमएम टायटन्स, ललित लान्सर्स, एमकेटी इन्शुरन्स ब्रोकर्स, होलानी पँथर्स, बी प्लस सुरक्षा या दहा संघांच्या १०० खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता. अंतिम सामना काबरा वॉरियर्स विरुद्ध बी प्लस सुरक्षा यांच्यात झाला आणि त्यात ३० धावांनी विजय मिळवून काबरा वॉरियर्स संघ या स्पर्धेचा विजेता तर बी प्लस सुरक्षा संघ उपविजेता ठरला. राहुल तोतला उत्कृष्ट फलंदाज, संदीप राठी उत्कृष्ट गोलंदाज, रवी लोया उत्कृष्ट क्षेत्ररक्षक डॉ. श्रद्धा सोमानी उत्कृष्ट महिला खेळाडू तर रोहित भक्कड प्रेस्टीजीएस बॅट्समन ठरला. विजेत्या, उपविजेत्या संघाला अनुक्रमे १५ हजार आणि १० हजार रुपयाचे रोख बक्षीस, ट्रॉफी प्रदान करण्यात आली.


